नियमीत दिवाणी दावा क्र. ३९/२०१९
माणिकलाल/ शालीकराम
निशाणी क्र. २० खाली

**उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. ए. जी. महाजन यांच्यामार्फत :-**

४. मला दस्ताऐवजांचे महत्व माहित आहे. मी शेतकरी आहे व मला शेतीच्या दस्ताऐवजांची माहीती आहे. हे म्हणणे खरे नाही की मला वयाच्या २०–२५ वर्षापासून शेतीच्या कागदपत्राबददल माहिती आहे. मी मुंबई येथे नौकरीला होतो. मी २७ व्या वषी नौकरीला लागलो. माझे वय आज ७० आहे. मी दहावी पास आहे. मी शेतीबाबत कोणतेही प्रशिक्षण घेतले नाही. वादातील शेत जमीन ही दूलार गावाची असून त्याचा सर्वे नं. १००,१०१,१०२ असे आहेत व ईतर सर्वे नं. मला आठवत नाही.

५. हे म्हणणे खरे नाही की वाद शेती म्हणून ज्या सर्व शेतींचा उल्लेख केला आहे त्या पाचाबाई आणि मुनियाबाई यांच्या मालकीच्या होत्या. हे मला आठवत नाही की वादातील शेतजमिनींवर पाचाबाई आणि मुनियाबाई यांचे नाव लागले होते किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की मी पाचाबाई आणि मुनियाबाई यांचे नावाचे सातबाराचे उतारे अभिलेखावर लावलेले आहेत. वादातील शेतजमिनींचे जूने सर्वे नंबर मला सांगता येणार नाहीत. हे म्हणणे खरे आहे की वादातील शेतजमिन सर्वे नं. १९९ आणि २३३ हे गावखारी आहेत. हे म्हणणे खरे आहे की मी वादातील शेतजमिन सर्वे नं. १०० मी वाहतो. हे म्हणणे खरे आहे की, वादातील शेतजमिन सर्वे नं. १०१ ही झनकलाल वाहतात. हे म्हणणे खरे आहे की, वादातील शेतजमिन सर्वे नं. १०२ ही शालीकराम वाहतात. हे म्हणणे खरे आहे की, वादातील शेतजमिन सर्वे नं. २४६ ही आनंदराव वाहतात. हे मला माहित नाही की प्रतिवादी क्र. १ व २ शालीकराम व आनंदराव यांना शेतीव्यतीरीक्त दूसरे कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही.

६.	माझ्या आजोबांचे नाव फतेसिंह वरखडे आहे. बल्ली धोंडू भलावी हे माझ्या आईचे वडील होते. हे म्हणणे खरे आहे की बल्ली यांच्या पत्नीचे नाव पाचेबाई असून त्यांना मूनियाबाई ही एकूलती एक मूलगी होती. पाचेबाई व मूनियाबाई यांचे नाव सातबाराचे उता–यावर कसे लागले याबाबत मी चौकशी केली नाही. मला वेळ मिळाला नाही म्हणून मी चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की मी नौकरी निम्मीत बाहेर असल्याने मला गावी येणे जमत नव्हते. हे म्हणणे खरे आहे की मी नौकरीच्या निमित्ताने वेगवेगळया गावी असायचो. मी सन २०१६ साली सेवानिव्रत्त झालो.

७.	मी सेवानिव्रत्त झाल्यानंतर शेतीचे कागदपत्र् पाहिले त्यावेळी मला त्याबाबत समजले. मी नौकरी निमित्त बाहेर असल्याने शेती करत नव्हतो. मत्यूपत्राबाबत मला काहीही माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की मला मत्यूपत्राबाबत काहीही माहिती नसल्याने मी दाव्यामध्ये त्याचा उल्लेख केला नाही. हे मला माहित नाही की मत्यूपत्र आजरोजी देखील अस्तित्वात आहे किंवा नाही. हे म्हणणे खरे आहे की माझ्या सर्व बहिंणी लग्न होउन आपापल्या घरी वेगवेगळया गावी राहतात. हे म्हणणे खरे आहे की सूरजलाल वरखडे माझे वडिल आहे व ते सासरी घरजावई होते. हे म्हणणे खरे आहे की दूलारा ते देवलापार हे साधारण १५ किमी. अंतरावर आहे व माझा सध्या रहिवास कुटूबासह देवलापार येथे आहे. हे म्हणणे खरे आहे की सध्या सर्वे नं. १०२ हा शालिकराम यांचे नावाने आहे आणि सर्वे नं. २४६ हा आनंदाराव यांच्या नावी सातबारा उता–यावर आहे.

८.	हे म्हणणे खरे आहे की शालिकराम आणि आनंदराव व्यतीरिक्त मुनियाबाई यांच्या ईतर कुठल्याही वारसानचे नावे सर्वे नं. १०२ आणि २४६ वर लागलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की माझे नाव सर्वे नं. १०२ आणि २४६ वर लागलेली नाही. प्रतिवादी क्र. १ आणि २ शालिकराम आणि आनंदराव यांचे नाव सातबारा उता–यावर कसे लागले याबाबत मी कधी माहिती घेतली नाही. मी सन २०१६ मध्ये सेवानिव्रत्त झाल्यानंतर देखिल माहिती काढली नाही. मी सेवानिव्रत्त झाल्यानंतर अपंग असल्याने १ वषे आराम केला. मी जन्मापासून अपंग आहे. सन २०१७–१८ साली देखील मी नावे कशी लागली

याबाबत माहिती घेतली नाही. शेत सर्वे नं. १०२ आणि २४६ या सर्वे नंबरवर शालिकराम आणि आनंदराव यांचे नाव लावलेल्या फेरफाराविरध्द मी एस. डि. ओ. यांच्याकडे कधिही अपील केली नाही. हे म्हणणे खरे आहे की शेत सर्वे नं. १००, १०१,१९९,२३३ यावर सर्व वादी आणि प्रतिवादी यांची नावे सातबारा उता–यावर आहेत.

९. हे म्हणणे खरे आहे की वादातील शेतजमिन सर्वे नं. १०० हा मी, १०१ ही झनकलाल , वादातील शेतजमिन सर्वे नं. १०२ ही शालीकराम, वादातील शेतजमिन सर्वे नं. २४६ ही आनंदराव असे आम्ही वयात आल्यापासून वाहतो व हे आम्हा सर्व भाउबहिंणींना माहित आहे. हे म्हणणे खरे आहे की सदरच्या शेतजमिनी आम्ही आपसी घरगुती बैठकीनूसार वाहतो. हे म्हणणे खरे नाही की आम्ही सदरच्या शेतजमिनी आपसी घरगुती बैठकीच्या तोंडी वाटणीनुसार वाहतो.

**सकाळच्या सत्राची वेळ संपल्याने उलटतपास तहकूब.**

श्रवणोत्तर स्वीकृत, माझे समक्ष,

सही/–

रामटेक. (ए. ए. शिरवळकर)

दिनांक : २९/१०/२०२५. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रामटेक